# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक - ( यादी प्रमाणे )

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे-१

तक्रारदार श्री. मनोज सुरेंद्रकुमार अगरवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे कलम १८ अंतर्गत सोबत विवरण पत्रात नमूद केल्याप्रमाणे एकूण १४ तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तक्रारदार यांनी केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता हे तक्रार अर्ज प्रामुख्याने कलम ६ अन्वये माहिती अर्ज करून कलम १८ अन्वये तक्रार अर्ज/कलम ६ अन्वये माहिती अर्ज व कलम १९(१) अन्वये प्रथम अपील करून कलम १८ अन्वये तक्रार अर्ज अशा प्रकारे केले असल्याचे दिसून आले आहे

मा. सर्वोच्च न्यायालयाने, मुख्य माहिती आयुक्त व इतर विरुद्ध मणिपूर राज्य सरकार, सिव्हील अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या प्रकरणी दि. १२.१२.२०११ रोजी दिलेल्या न्याय निर्णयामध्ये कलम १८ ची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. तसेच या आदेशाच्या परिच्छेद ३५ मध्ये असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थी/ तक्रारदार यांनी माहिती मिळविण्यासाठी कायद्याने ठरवून दिल्यानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रिये नुसार आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक आहे. तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९(३) अन्वये आयोगास द्वितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता या सर्व तक्रार प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम १८ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रियेचा अवलंब न करता व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात न घेता आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रारी दाखल केल्या आहेत असे स्पष्ट होत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत दाखल केलेल्या १४ तक्रारी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाशी सुसंगत नसल्याने, या तक्रारी विना कार्यवाही निकाली काढण्यास पात्र आहेत या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. सबब आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

तक्रारदार यांचे १४ तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक - ( यादी प्रमाणे ) जावक.क्र - 9428/2025 दिनांक- 1/10/2025

तक्रारदाराचे नाव - मनोज सुरेंद्रकुमार अगरवाल

| अनु. क्र. | तक्रार क्रमांक | वर्ष | संबंधित जिल्हा | तक्रार दाखल दिनांक | जन माहिती अधिकारी पदनाम | जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1751 | 2024 | पुणे | 19.11.2024 | इमारत नियंत्रण ,परवानगी विभाग | पुणे महानगरपालिका ,शिवाजीनगर,पुणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1612 | 2024 | पुणे | 19.11.2024 | शासकीय जन माहिती अधिकारी | नगर भूमापन अधिकारी कार्यालय (क्रमांक 2), 931 शुक्रवार पेठ, मामलेदार कचेरी, खडकमाळ आळी, पुणे 411002 |
| 3 | 258 | 2021 | पुणे | 09.11.2021 | पोलीस सहाय्यक आयुक्त | येरवडा विभाग, खडकी एसीपी ऑफिस, राजा बंगलो, जुने पुणे मुंबई रोड, खडकी, पुणे |
| 4 | 257 | 2021 | पुणे | 09.11.2021 | अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय | लोहमार्ग पोलीस पुणे, सीआयडी ऑफिस कंपाउंड, संगम ब्रिज जवळ, शिवाजीनगर, पुणे 411005 |
| 5 | 256 | 2021 | पुणे | 09.11.2021 | जन माहिती अधिकारी | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे मंगलदास पोलीस चौकी मागे, ४५/२ के.वी. एस. ढोले पाटील मार्ग, वाडीया कॉलेजसमोर, पुणे - ४११ ००१ |
| 6 | 1611 | 2024 | पुणे | 19.11.2024 | जन माहिती अधिकारी | नगर भूमापन अधिकारी कार्यालय (क्रमांक 2), 931 शुक्रवार पेठ, मामलेदार कचेरी, खडकमाळ आळी, पुणे 411002 |
| 7 | 1752 | 2024 | पुणे | 19.11.2024 | नगर भूमापन अधिकारी | कार्यालय (क्रमांक 2), 931 शुक्रवार पेठ, मामलेदार कचेरी, खडकमाळ आळी, पुणे 411002 |
| 8 | 889 | 2023 | पुणे | 04.10.2023 | सहाय्यक निबंधक | भागीदारी संस्था पुणे47/30 सरस्वती पार्वती भवन, दुसरा मजला, लोकेश हॉटेल मागे, आरणेश्वर कॉर्नर, पुणे सातारा रोड, पुणे 411009 |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | 205 | 2021 | पुणे | 06.09.2021 | उप अधीक्षक | विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे 411005. |
| 10 | 890 | 2023 | पुणे | 03.10.2023 | सहाय्यक निबंधक | भागीदारी संस्था पुणे47/30 सरस्वती पार्वती भवन, दुसरा मजला, लोकेश हॉटेल मागे, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे सातारा रोड, पुणे 411009. |
| 11 | 206 | 2021 | पुणे | 08.09.2021 | उप अधीक्षक (विद्युत विभाग) | (विद्युत विभाग) पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे 411005 |
| 12 | 214 | 2021 | पुणे | 14.09.2021 | प्रशासन अधिकारी | प्रशासन अधिकारी (आरोग्य विभाग) पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे 411005 |
| 13 | 242 | 2021 | पुणे | 18/10/2021 | उपअधिक्षक | अति. महापालिका आयुक्त (इस्टेटस) कार्यालय पुणे महानगरपालिका |
| 14 | 243 | 2021 | पुणे | 20.10.2021 | उपकार्यकारी अभियंता, | म.रा.वि.वि.कं.मर्या. नगर रोड विभाग, पुणे |

*******************

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ